N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** नवापूर **Year (वर्ष):** 2023

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0055 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/02/2023 01:22 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date From (दिनांक पासून):** 22/02/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/02/2023
   **Time From (वेळेपासून):** 10:23 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 11:30 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 23/02/2023 **Time (वेळ):** 00:30 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/02/2023 01:03 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 03 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** नवापुर बेडकी चेकपोस्ट,यांचे कार्यालयात

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** भाऊसाहेब मारुती खाडे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1996 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | चिचपुर पांगुळ,पाथर्डी,पाथर्डी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | चिचपुर पांगुळ,पाथर्डी,पाथर्डी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय मगन मावची | | | 1. करंजी ओवारा,नवापुर,नवापूर,नंदुरबार, महाराष्ट्र,भारत |
| 2 | महेश हिरालाल काळे | | | 1. गावठाण सिन्नर मारोती मंदिराजवळ, सिन्नर ,सिन्नर ,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 | 500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 500.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद नवापुर पोलीस ठाणे, दि. 23/02/2023मी भाउसाहेब मारुती खाडे, वय 26 वर्ष, व्यवसाय ड्रायव्हर, रा. चिचपुर पांगुळ ता पाथर्डी जि अहमदनगर मो.नं 9854744141 समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहून फिर्याद लिहून देतो की, मी वरील प्रमाणे असून वरील नमुद ठिकाणी आई वडील भाउ असे एकत्रीत रहाण्यास आहे. मी सुमारे 2 वर्षापासून आमचे मालकीचे ट्रकवर चालक म्हणून काम करतो, माझे वाहन क्रमांक एम एच 06 बीडी 5999 हे चेक नाका पास करून देण्याचे मोबदल्यात नवापुर चेक पोस्ट वरील खाजगी इसम विजय मावची हे वाहन पास करून देण्याचे मोबादल्यात लाचेची मागणी करत असल्याने सदर बाबत तक्रार देण्यासाठी मी दि. 21.08.2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाषिक येथे गेलो. तेथे पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाषिक परिक्षेत्र, नाषिक यांना समक्ष भेटलो त्यांनी पोलीस निरीक्षक श्रीमती इंगळे मडम यांना बोलावुन पुढील कार्यवाही करणेबाबत आदेषीत केले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती इंगळे मडम यांनी दोन पंच उपलब्ध करून त्यांना बोलाविले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती इंगळे मडम यांनी पोहवा/डांगरे, पोहवा माळी द पंच श्री. रोहित अहिर, कनिश्ठ सहायक(लिपीक) व श्रीमती राहिणी गावीत,वरीश्ठ सहायक(लेखा) यांची ओळख करून दिली. तसेच पोलीस निरीक्षक श्रीमती इंगळे मडम यांनी पंचासमक्ष माझे नाव, पत्ता विचारुन माझा ही परिचय सर्वांना करून दिला. पोलीस निरीक्षक श्रीमती इंगळे मडम यांनी पंचासमक्ष मला माझे तक्रारी बाबत विचारले असता मी पंचासमक्ष त्यांना पुढील प्रमाणे तक्रार सांगितली. मी सुमारे 2 वर्षापासून आमचे मालकीचे ट्रकवर चालक म्हणून काम करतो, आमचे ट्रकांना ऑल इंडीया परमिट असल्याने मी गुजरात, अहमदनगर, पुणे येथे माल पोहचविण्याचे काम करतो. माझे ट्रक हे नेहमी गुजरात-महाराश्ट्र नवापुर मार्गे जात येत असतात. नवापुर चेक पोस्ट येथे माझे ट्रक चे कागदपत्र बराबर असतांना देखील तथील खाजगी आरटीओ एजंट हे ट्रक सोडण्याचे व येण्याचे मोबदल्यात नेहमी पैशांची मागणी करतात. तसेच विठ्ठल दहिफळे हे देखील ब-याचदा माझे सोबत सह चालक म्हणून येत असतात. तसेच माझे ट्रक व्यतिरीक्त तो इतरही लोकांच्या ट्रकवर चालक म्हणून अंकलेष्वर, सुरत येथे जात येत असतो. तेव्हा नवापुर चेक पोस्ट नवापुर येथील खाजगी आरटीओ एजंट विजय मावची हा नेहमी पैसे घेवून ट्रक सोडत असल्याने ट्रक चालक त्याला पैसे देवून चेक पोस्ट क्रस करत असतात. दि. 19.02.2023 रोजी विठ्ठल दहिफळे हा माझा ट्रक क्र एम एच 06 बीडी 5999 हा घेवून अंकलेष्वर नवापुर मार्गे रांजणगांव असा येणार असल्याने मला विठ्ठलने सांगितले की, त्याला खाजगी आरटीओ एजंट विजय मावची यास पैसे/लाच देवून नवापुर चेक पोस्ट क्रस करावयाची नाही. त्यावेळी मी विठ्ठल यास सांगतले की,



Scanned with CamScanner

तु नाषिक येथे ये व आपण दोघे मिळून अन्टी करप्षन ब्युरो नाषिक येथे तक्रार देण्यास जावू. त्याप्रमाणे दि. 21.02.2023 रोजी मी व विठठल दहिफळे असे नाषिक येथे आलो व मी आरटीओ चेक पोस्ट नवापुर येथे चेक नाका पास करून देण्याचे मोबदल्यात खाजगी एजंट विजय मावची यास मला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्याचे विरूध्द तक्रार देत आहे. तसेच त्यांचेत व माझेत कोणताही आर्थीक व्यवहार नसल्याने त्यांचेवर कायदेषीर कारवाई करावी. अषा मजकुराची तक्रार मी स्वतः हस्ताक्षरात लिहुन त्यावर माझी सही केल्यानंतर सदर तक्रारीवर पोलीस निरीक्षक श्रीमती इंगळे मडम व पंचांनी सहया केल्या.त्यानंतर माझे तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे नवापुर चेक पोस्ट वरील आरटीओ अधिकारी हे खरोखरच माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्याकरीता जाण्याच्या योग्य त्या सुचना दिल्या त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती इंगळे मडम यांनी खाजगी इनोव्हा वाहन क्रमांक एम एच 04 एफ एफ 5627 हे बोलावून घेतले. तेव्हा मी, पोलीस निरीक्षक श्रीमती इंगळे मडम, पोहवा माळी, डोंगरे तसेच दोन पंच असे खाजगी इनोव्हा वाहन क्रमांक एम एच 04 एफ एफ 5627 ने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाषिक कार्यालयातून 23.50 वा. निघून सटाणा,देवळा मार्गे नवापुर चेक पोस्ट नाका नंदुरबार येथे रवाना झालो. दि.22.2.2023 रोजीचे साधारण पहाटे 5.30 वा सुमारास नवापुर गावाचे अलिकडे एच पी पेट्रोल पंच जवळ रोडवर येवून थांबलो. त्यावेळी पडताळणी करण्याकरीता मला व सापळा पथक यांना योग्य त्या सुचना दिल्या. तेव्हा विठठल दहिफळे हा एम एच 06 बी डी 5999 हे वाहन घेवून आमचेजवळ आला. तेव्हा विठठल दहिफळे यांने सं◌ागितले की, खाजगी इसम विजय मावची हे पलीकडच्या चेक पोस्टवर आहेत. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती इंगळे मडम यांनी त्याबाजुला जाण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी तसेच पंच नं 1 श्री. अहिरे◌ असे माझे वाहन एम एच 06 बी डी 5999 ने पोहवा माळी व डोंगरे असे रवाना झालो. त्यानंतर नवापुर चेक पोस्टचे अलीकडे 1 किलोमीटर व्हाईस रेकर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकर्डर माझेकडे देवुन मला व पंच नं 1 श्री. अहिरे◌ असे आम्हाला रवाना केले तेव्हा 09.51 वा. होते. मी नवापुर चेकपोस्टचे कार्यालयाचे परीसरात माझे वाहन लावले. त्यानंतर मी व पंच श्री अहिरे◌ असे गाडीचे खाली उतरून चेक पोस्टचे कबीन कडे गेलो तेव्हा ट्रकमध्ये पोहवा माळी व डोंगरे असे लपून बसले. तसेच पोलीस निरीक्षक श्री इंगळे मडम व पंच नं 2 असे खाजगी वाहनात बसून राहिले. त्यानंतर मी व पंच श्री अहिरे◌ असे चेकपोस्टचे कबीनबाहेर असलेल्या खिडकीत गेलो. तेव्हा खाजगी इसम हे तेथेच बसलेले होते व त्यांचे षेजारी आरटीओ साहेब बसलेले होते. तेव्हा ट्रक सोडण्याबाबत आमचेत बोलणे झाले तेव्हा आरटीओ अधिकारी यं◌ाचे समोर खाजगी इसम यांनी एक काम कर ऐवढे (हाताचे इषा-याने 5बोटे ) असे दाखवून 500 रू ची लाचेची मागणी केली. तेव्ही मी त्यांना म्हणालो दोन मिनीट फक्त ते पैसे पाठवतेत त्यांच्यामुळं थांबलो हे मी एन्ट्री दयायला, मी नाही म्हणत नाही पण पैसे पाठवतात म्हणून थांबलो हे मी असे सांगुन मी व पंच श्री. अहिरे◌ असे ट्रकमध्ये आलो. तेव्हा मी घडलेली हकिगत पोहवा माळी व डोंगरे यांना सांगितली. तेव्हा पोलीस निरीक्षक श्रीमती इंगळे मडम यांना झालेले संभाशन मधील महत्वाचे रेकर्डींग मोबाईलवर एकवून पैषाची मागणी केल्याची खात्री केली. त्यानंतर खाजगी इसम यांने लागलीच 500 रूची मागणी केलेली असल्याने मागणी केल्याप्रमाणे त्यांना देण्यासाठी 500/-रुपये हजर करण्यास मला सांगितले असता मी 200/- रुपये दराच्या 02 व 100 रू दराची 1 चलनी नोटा असे एकुण 500/- रुपये पंच नं 1 अहिरे यांचे पंचासमक्ष हजर केले. त्यानंतर पोहवा/डोंगरे यांनी लाचेच्या सापळयात अन्थ्रासिन पावडर कषी लावली जाते याबाबत व अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाषात अन्थ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबतचे प्रात्यक्षिक करुन दाखविले त्यानंतर पोहवा/डोंगरे यांनी मी हजर केलेले 500 रुपये त्यात 200 रू दराच्या 2 व 100 रू दराची 1 चलनी नोटांना माझे व पंचासमक्ष अन्थ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझे षर्टच्या डावे बाजुचे खिषात ठेवल्या तसेच मला पंच श्री. अहिरे◌ यांना सोबत घेवुन खाजगी इसम व आरटीओ अधिकारी यांची भेट घेवुन माझे कामासंदर्भात बोलणी करावी व खाजगी इसम व आरटीओ अधिकारी यांनी लाचेच्या रक्कमेची मागणी केली तरच षर्टच्या डावे बाजुचे खिषात ठेवण्यात आलेल्या अन्थ्रासिन पावडर लावुन ठेवलेल्या नोटा उजव्या हाताने काढुन त्याच हाताने द्याव्यात तोपावेतो नोटांना हात लावु नये वेगैरे योग्य त्या सुचना दिल्या. तसेच खाजगी इसम यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी हा षेठ पोहचतो वेळेवर असे म्हणून पैसे स्विकारल्याचा पुर्वनियोजित इषारा ठरला. त्यानंतर मला व पंच श्री. अहिरे असे आम्हाला योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोहवा/ माळी यांनी व्हाईस रेकर्डर चालु करुन ते माझे षर्टाच्या आतील बाजुस बनियनला सेफ्टी पाऊचच्या सहाय्याने लावले व 10◌:19 वाजता यानंतर मी पंच नं 1 अहिरे◌ असे माझेकडील वाहनातून खाली उतरुन नवापुर चेक पोस्टचे कार्यालयात गेलो. त्यावेळी खाजगी इसम हे आतील बाजुस बसलेले होते. तसेच आरटीओ अधिकारी हे त्याचे मागील खुर्चीवर बसलेले होते. तेव्हा मी त्यांना सर आता काही अडचण नई ना तुम्हाला असे म्हणून माझे डावे खिषातील लाचेची रक्कम खाजगी इसम यांचेसमोर धरली असता ती त्यांनी उजव्या हाताने स्विकारून त्यांचे पन्टचे उजवे खिषात ठेवली. त्यानंतर मी पुर्वनियोजीत ठरलेला इषारा केला असता, चेक पोस्टचे बाहेरचे बाजुस उभे असलेले पोहवा माळी व पोहवा डोंगरे असे चेक पोस्टेचे कबीनमध्ये गेले. त्यानंतर त्यांचे पाठोपाठ मी व पंच श्री. अहिरे◌ असे गेलो. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती इंगळे मडम या आल्या. त्यावेळी त्यांनी खाजगी इसम यास स्विकारलेली लाचेची रक्कम कोठे ठेवली याबाबत मला विचारले असता मी, सदरची रक्कम त्यांनी पन्टचे उजवे बाजुचे खिषात ठेवली असल्याचे सं◌ागितले. तेव्हा पंच नं 1 अहिरे◌ यांना सदर रक्कमेबाबत खात्री करण्यासाठी पोलीस निरीक्षक श्रीमती इंगळे यांनी सांगितले असता खाजगी इसम यांचे उजवे बाजुचे खिषात लाचेची रक्कम मिळून आली नाही त्यानंतर खाजगी इसम यांचे उजवे बाजुचा ड्र्व्हर चेक केला असता पेपरचे खाली 200 रुपये दराच्या 2 व 100 रू दराची एक चलनी नोटा मिळुन आल्यात त्या नोटांची पंच नं 2 श्रीमती गावीत यांचेमार्फत खात्री केली असता सापळापुर्व पंचनाम्यातील ने◌ाटांचे नंबर व हस्तगत करण्यात आलेली रक्कम ही तंतोतंत जुळुन आली त्यावेळी खाजगी इसम विजय माउची व महेष काळे यांना ताब्यात घेवुन पुढील कारवाईसाठी षासकिय विश्रामगृह नवापुर येथे घेवुन आले. तरी मी माझेकडील ट्रक वाहन हे गुजरात राज्यामधून महाराश्ट्र राज्याचे हददीत प्रवेष करण्यासाठी खाजगी इसम विजय मगन मावची यांनी माझे वाहनाचे सर्व कागदपत्रे बरोबर असतांना देखील दि. 22.02.2023 रोजी पंच साक्षीदारासमक्ष 500 रूची मागणी करून लाचेची रक्कम स्विकारली तसेच मोटार वाहन निरीक्षक महेष हिरालाल काळे यांनी खाजगी इसम विजय मावची यास लाच घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. म्हणुन माझी विजय मगन मावची वय 40, खाजगी इसम व 2. महेष हिरालाल काळे वय 38 पद मोटार वाहन निरीक्षक नेम नवापुर चेक पोस्ट यांचेविरूध्द कायदेषीर फिर्याद आहे.माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आली असुन ती मला वाचुन दाखविली असता ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.



Scanned with CamScanner

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): balasaheb sahebrao bhapkar(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Balshade

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

प्रत मिळाली
Balshade

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची)
**Name (नाव):** balasaheb sahebrao bhapkar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI



Scanned with CamScanner

(24)



**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with CamScanner